महाराष्ट्र टाइम्स । नागपूर । शुक्रवार, २९ जुलै २०२२

# अवती-भवती



## 'वेळ पाण्यासारखा, सदुपयोग करा'

नागपूर : 'वेळ हा पाण्यासारखा आहे, त्याचा वापर जपून करा. काळ झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या स्वप्नपूर्तीसाठी नवसंकल्पनांचा विचार करायला हवा', असे प्रतिपादन आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मैत्री यांनी केले. दी इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडियाच्या नागपूर शाखेतर्फे चार्टर्ड अकाउंटंटच्या (सीए) विद्यार्थ्यांकरिता दोनदिवसीय परिसंवाद घेण्यात आला. स्टुडण्ट स्किल इनरिचमेंट बोर्डच्या (एसएसईबी) सहकार्याने झालेल्या कार्यक्रमाच्या उद्घाटनपर सत्रात मैत्री बोलत होते. यावेळी एसएसईबीचे अध्यक्ष संजीव कुमार गोयल, नागपूर शाखेचे अध्यक्ष जितेंद्र सगलानी, सचिव अक्षय गुल्हाणे, विकासाचे अध्यक्ष दीपक जेठवानी, बोर्ड ऑफ स्टडीजचे अध्यक्ष विशाल दोशी, कॉन्फरन्स डायरेक्टर उमेश शर्मा, सेंट्रल कौन्सिलचे सदस्य धीरजकुमार खंडेलवाल, सेंट्रल कौन्सिलचे माजी सदस्य जय छायरा उपस्थित होते. अक्षय गुल्हाणे यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी कोषाध्यक्ष दिनेश राठी, व्यवस्थापकीय समितीच्या सदस्य स्वरूपा वझलवार, अजय वासवानी यांनी प्रयत्न केले. यावेळी कविता लोया, साकेत बागडिया, प्राजक्ता गुप्ता, अनुष्का रिंगणगावकर, आँचल दुबे, कलश गजरानी, श्रेया पोकळे, रिद्धी धुवाविआ, पार्थ शुक्ला आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.